# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक – १६ फेब्रुवारी २०१५

## •राष्ट्रीय युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाची विजयी पताका

## •राष्ट्रीय युवा महोत्सवावर मुंबई विद्यापीठाची मोहोर

- **७ वर्षांत सलग ६ वेळा अव्वल स्थानी**
- **१३ वेळा निर्विवाद वर्चस्व**

मुंबई- ३० व्या राष्ट्रीय युवा महोत्सामध्ये मुंबई विद्यापीठाने विजयी पताका फडकावली आहे. एसोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजने आयोजित केलेल्या या युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने निर्विवाद वर्चस्व राखले आहे. लिटरेचर, फाइन आर्ट्स, थिएटर, म्युझिक आणि डान्स या पाच विभागांतील स्पर्धामध्ये विजयी सलामी देत आणि ८३ गुणांची कमाई करत परत एकदा युवा महोत्सवाचा चषक मुंबई विद्यापीठाच्या टीमने आपल्याकडेच राखला आहे.मुंबई विद्यापीठाने ८३ गुणांची कमाई करत गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर (५०), ला मागे टाकत मुंबई विद्यापीठाने बाजी मारली आहे.सात वर्षांमध्ये सलग सहा वेळा अव्वलस्थानी राहण्याचा बहुमान मुंबई विद्यापीठाने पटकाविला आहे.राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये १३ वेळा निर्विवाद वर्चस्व राखण्याचा बहुमानही विद्यापीठाला मिळाला आहे.

एसोशिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीने आयोजित केलेल्या या युवा महोत्सवामध्ये पाच विभागीय क्षेत्रांमधून ७४ विद्यापीठांनी भाग घेतला होता. ७४ विद्यापीठामध्ये रंगलेल्या या सोहळ्यात मुंबई विद्यापीठाने गुरुनानक देव विद्यापीठ अमृतसर,लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी,बनारस हिंदू विद्यापीठ,जम्मू विद्यापीठ आणि देवी अहिल्या विद्यापीठाला मागे टाकत अव्वल स्थान पटकाविला आहे.

देवी अहिल्या विद्यापीठ इंदुर येथे १२ ते १६ या दरम्यान या युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

महर्षी दयानंद सरस्वती विद्यापीठ,अजमेर येथे १९ ते २२ नोव्हेंबर २०१४ ला  आयोजित केलेल्या वेस्ट झोन युवा महोत्सवामध्ये १३ विविध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावून राष्ट्रीय युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाचा समावेश झाला होता.
मुंबई विद्यापीठातर्फे मीठीबाई कॉलेज,रुईया कॉलेज,एसआयईसी कॉलेज,डीबीजे कॉलेज,जोशी बेडेकर,संगीत विभाग,विवा कॉलेज,पोतदार कॉलेज,एसकेपी मालवण,डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज,राजीव गांधी नाईट कॉलेज,डहाणूकर कॉलेज,गोगटे कॉलेज,रत्नागिरी कॉलेज,लॉर्ड्स कॉलेज,गोनसालिया कॉलेज,जेजे स्कूल ऑफ फाईन आर्ट,के.जे.सोमय्या कॉलेज,इ.महाविद्यालयांनी या युवा महोत्सवामध्ये भाग घेऊन स्पर्धांवर निर्विवाद वर्चस्व मिळविले.या स्पर्धांमध्ये ज्यांचे मोलाचे सहकार्य लाभले असे मंदार पिलवलकर (फोक ऑर्केस्ट्रा),मधूर पडवळ (वेस्टर्न ग्रुप),राहूल खाडे आणि तेजस काळे (इंडियन ग्रुप सॉंग),सुमित पाटील (फाईन आर्ट), समीर शिरोडकर(मिआमी),निलेश गोपनारायन आणि समीर खांडेकर (वन एक्ट प्ले) या सर्वांनी स्पर्धेतल्या स्पर्धकांसाठी विशेष प्रयत्न केले.

स्पर्धांचे निकाल खालील प्रमाणे-

फोल्क ऑर्केस्ट्रा-नेशनल गोल्ड
इंडियन क्लासिकल व्होकल- नेशनल गोल्ड
क्वीझ-नेशनल गोल्ड
पोस्टर मेकींग- नेशनल गोल्ड
मिआमी- नेशनल गोल्ड
रंगोली- सिल्व्हर
क्लासिकल डांस- सिल्व्हर
नॉन पर्क्युशन- सिल्व्हर
इंडियन ग्रुप सॉंग – सिल्व्हर
वेस्टर्न ग्रुप सॉंग- सिल्व्हर
क्लासिकल इंस्ट्रुमेंटल- सिल्व्हर

इन्स्टालेशन,वन एक्ट प्ले आणि क्ले मॉडेलिंग मध्ये तृतीत क्रमांक पटकाविला आहे.

स्पर्धक आणि प्रेक्षकांच्या प्रचंड प्रतिसादात पार पडलेल्या या ३० व्या राष्ट्रीय युवा महोत्सावामध्ये निर्विवाद वर्चस्व राखत मुंबई विद्यापीठाने बाजी मारली आहे.

( " मुंबई विद्यापीठाने केलेल्या या दैदिप्यमान कामगिरीमुळे आज राष्ट्रीय स्तरावर मुंबई विद्यापीठाचा नावलौकीक होतो आहे,विद्यापीठ प्रशासनाच्या सहकार्याने आम्हाला ही विजयी पताका फडकावता आली आहे. आमच्यासाठी ही मोठी संधी आहे,वन एक्ट प्ले, वेस्टर्न ग्रुप सॉंग आणि क्लासिकल डांसमध्ये सुवर्ण पदक पटकाविला असता तर मुंबई विद्यापीठाला ९७ पॉईंट्स मिळाले असते" – डॉ.मृदूल निळे,संचालक,विद्यार्थी कल्याण विभाग,मुंबई विद्यापीठ)

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)